# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.09.2024** **वारःगुरुवार**

---

महाराष्ट्र शासनानं महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावलं उचलून महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
पंतप्रधान नरेंद्र मोदी सिंगापूरचे समपदस्थ लॉरेंस वोंग यांच्यात आज बैठक, आरोग्य आणि सेमी कंडक्टरसह विविध क्षेत्रांमध्ये करार
केंद्र सरकार, नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा आणि ऑलत्रिपुरा टायगर फोर्स यांच्यादरम्यान ऐतिहासिक करार
आणि
पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेत भारतीय क्रिडापटूंची आतापर्यंत २४ पदकांची कमाई, काल एकाच दिवशी चार पदकांवर मोहोर

**<u>राष्ट्रपती</u>**

महिला शिक्षित झाली, तर पूर्ण कुटुंब, भावी पिढी शिक्षित होते आणि हेच सक्षमीकरणासाठी देखील लागू होतं असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. महाराष्ट्राच्या लातूर जिल्ह्यात उदगीर इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात त्या काल बोलत होत्या. महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करावं, आपल्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वत:कडे देखील लक्ष द्यावं असं आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केलं.

महाराष्ट्र शासनानं महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावलं उचलून महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवला आहे, अशा शब्दात राष्ट्रपतींनी राज्यातल्या महिला विकासाच्या योजनांचं कौतुक केलं.
या कार्यक्रमाला राज्यपाल सी पी राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन, मंत्री संजय बनसोडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे उपस्थित होते.

महिला सशक्त झाल्या, तरच आपल्या देशाचा विकास होईल, असं मत रामदास आठवले यांनी व्यक्त केलं.
तर मुख्यमंत्र्यांनी, राज्य सरकारच्या महिला आणि शेतकऱ्यांसाठीच्या योजनांची माहिती दिली. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन सरकार वाटचाल करत असल्याचं उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, तसंच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या लाभार्थ्यांना निधीवाटप करण्यात आलं.

तत्पूर्वी राष्ट्रपतींच्या हस्ते तळवेस परिसरात बांधलेल्या विश्वशांती बुद्ध विहाराचं लोकार्पण करण्यात आलं. या बुद्ध विहारात बाराशे अनुयायांसाठी बैठक व्यवस्था असलेलं ध्यान मंदिर असून विहाराच्या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधल्या सांची स्तूपासारखी आहे.

उदगीर इथल्या कार्यक्रमानंतर राष्ट्रपतींनी नांदेड इथं श्री सचखंड हुजुरसाहिब गुरुद्वाराला भेट दिली. यावेळी त्यांनी गुरुद्वारातील लंगरलाही भेट देऊन पाहणी केली.

**<u>पंप्र-सिंगापूर</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सिंगापूरचे त्यांचे समपदस्थ लॉरेंस वोंग यांच्यादरम्यान आज बैठक होणार आहे. भारत आणि सिंगापूरदरम्यान द्विपक्षीय भागीदारीसंदर्भातील प्रगतीचा ते आढावा घेतील तसंच दोनही देशांचे हितसंबंध असलेल्या प्रादेशिक आणि जागतिक स्तरावरील मुद्यांवर आपले विचार मांडतील. पंतप्रधान आपल्या दोन देशांच्या दौऱ्यातील ब्रुनोईचा दौरा आटोपून काल सिंगापूरला पोहोचले. सिंगापूरच्या पंतप्रधानांनी मोदींसाठी संध्याकाळच्या भोजनाचं आयोजन केलं होतं. यावेळी दोनही देशांची मैत्री विशेष असून विविध मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याचं पंतप्रधानांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

आज ते सिंगापूरचे राष्ट्रपती आणि इतर अनेक मान्यवरांच्या भेट घेणार आहेत. तसंच AEM या सेमीकंडक्टर टेस्ट इनोव्हेशनचे काम करणाऱ्या कंपनीला भेट देणार आहेत तसंच इतर क्षेत्रातील उद्योजकांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. पंतप्रधान मोदी सहा वर्षांनंतर सिंगापूर दौऱ्यावर आहेत. सिंगापूर हा ASEAN समूहातील भारताचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे आ5णि थेट विदेशी गुंतवणुकीचा प्रमुख स्त्रोत आहे. दरम्यान आरोग्य आणि उपचार तसंच सेमीकंडक्टर क्षेत्रातील सहकार्यासाठी दोन्ही देशांनी विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली आहे.

**आरबीआय**

भारतीय रिझर्व बँकेच्या केंद्रिय संचालक मंडळाची ६१० वी बैठक काल मुंबईत पार पडली. जागतिक आणि प्रादेशिक स्तरावरील आर्थिक परिस्थिती आणि भविष्यातील दृष्टीकोन यांचा आढावा घेण्यात आला. रिझर्व बँकेच्या विविध क्षेत्रातील कार्यापध्दती कशा रितीनं सुरु आहे याबाबत परीक्षण करण्यात आलं, ज्यामध्ये बँकेची स्थानिक मंडळांचं कामकाज आणि निवडक केंद्रीय कार्यालयातील विविध विभागांच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. RBI गव्हर्नर शक्तीकांत दास यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला डेप्युटी गव्हर्नर डॉ. मायकल देबब्रत पात्रा,  एम. राजेश्वर राव, टी. रबी शंकर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**ईपीएफओ**

कर्मचारी निवृत्तीवेतन योजनेतील वेतन १ जानेवारी २०२५ पासून निवृत्तीवेतनधारकांना देशभरातील कोणत्याही बँकेतून मिळू शकणार आहे. अशी माहिती केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय  यांनी काल दिली.  याचा लाभ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या 78 लाखांहून अधिक पेन्शनधारकांना होणार आहे. केंद्रीकृत पेन्शन पेमेंट यंत्रणेला मंजूरी मिळणं ही ईपीएफओच्या आधुनिकीकरणातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. असं मांडवीय यावेळी म्हणाले.

**त्रिपुरा**

केंद्र सरकार, त्रिपुरा सरकार आणि नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा, आणि ऑल त्रिपुरा टायगर फोर्स यांच्या प्रतिनिधींमध्ये सामंजस्य करारावर काल नवी दिल्ली इथं स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी गृहमंत्री अमित शहा, त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा, गृह मंत्रालय आणि त्रिपुरा सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नॅशनल फ्रंट आणि त्रिपुरा फ्रंट या संघटनांनी आपली शस्त्र टाकून मुख्य प्रवाहात येणं आणि त्रिपुराच्या विकासासाठी वचनबध्दता दर्शवणं ही अतिशय आनंदाची बाब असल्याचं अमित शहा यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

‘अष्टलक्ष्मी’ आणि ‘पूर्वोदय’ या संकल्पनांना एकत्र करून त्रिपुरासह संपूर्ण ईशान्य भारताचा विकास करण्याचा संकल्प केंद्र सरकारने घेतला आहे. काल झालेला करार हा या प्रवासातील मैलाचा दगड असल्याचं शहा म्हणाले. या करारानुसार, या संघटनांच्या 328 हून अधिक सशस्त्र सदस्यांनी हिंसाचाराच्या मार्गाचा त्याग करून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होतील आणि केवळ विकसित त्रिपुराच्या उभारणीतच नव्हे तर संपूर्ण भारताच्या विकासासाठी योगदान देतील. असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. ईशान्य भारताच्या विकासासाठी तसंच याभागात शांतात आणि समृध्दी यावी या उद्देशानं नरेंद्र मोदी सरकारनं आतापर्यंत १२ महत्वाचे करार केले आहेत. यातील ३ करार त्रिपुरासाठी आहेत आतापर्यंत हिंसाचार आणि संघर्षग्रस्त भागातील १० हजार नागरिकांनी आपली शस्त्र टाकून  मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत.

**भारत-टेक्स**

जागतिक स्तरावरील वस्त्रोद्योग प्रदर्शन अर्थात भारत टेक्स पुढील वर्षी १४ ते १७ फेब्रुवारीदरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम तसंच नॉइडातील भारत एक्सपो केंद्र आणि मार्ट इथं आयोजित करण्यात येणार आहे. अशी घोषणा केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी काल नवी दिल्ली इथं केली.   केंद्र सरकार आणि वस्त्रोद्योगातील विविध कंपन्यांनी हे योजन केलं आहे.  ५ हजार उद्योगांचे प्रतिनिधी आणि ६ हजारपेक्षा जास्त विक्रेते या उपक्रमांत सहभागी होणार आहेत.
हे प्रदर्शन 5F अर्थात वस्त्र धाग्यांसाठी शेती, उद्योग, फॅशन, परदेशी निर्यातीसाठी वस्त्र अशा संकल्पनेवर आधारित आहे.  संपूर्ण जगाचं लक्ष भारतावर आहे आणि भारतीय कापडाचं जागतिक स्तरावर विशेष आकर्षण आहे. त्यामुळे या प्रदर्शनाला महत्व आहे, असंही सिंग यावेळी बोलताना म्हणाले.

**एआयएफ पुरस्कार**

केंद्रिय कृषी मंत्रालयाच्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत देण्यात येणारा यंदाचा कृषी पायाभूत निधी सर्वोत्कृष्टता पुरस्कार महाराष्ट्राला मिळाला आहे. तसंच २०२२-२३ या वर्षासाठी राज्याला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. नवी दिल्लीत काल झालेल्या समारंभात केंद्रिय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत दिलेल्या कर्जावर वार्षिक ३ टक्के सवलत दिली जाते. या योजनेसाठी राज्यात गेल्या ऑगस्ट महिन्यापर्यंत विविध बँकांनी ८ हजार ३ शे ५३ प्रकल्पांसाठी ६ हजार १ शे १७ कोटी रुपयांचं कर्ज मंजूर केलं आहे.

या कार्यक्रमाच्या अनुषंगानं सर्व राज्यांमधल्या कृषी पायाभूत सुविधा निधीचा लाभ घेऊन उभारलेल्या प्रकल्पांमधल्या उत्पादनांचे स्टॉल लावण्यात आले होते. यात राज्यातून रायगड जिल्ह्यातल्या पूजा वायचळ यांच्या फलोत्पादनांच्या स्टॉलचा समावेश होता.

**आंध्र**

आंध्रप्रदेशमधील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाच्या २६ तुकड्या मदत आणि बचावकार्य करत आहेत. केंद्र आणि राज्यातील विविध बचावपथकांच्या मदतीने NDRF काम करत आहे. पुरग्रस्त भागातून आतापर्यंत ३१९ जणांना वाचवण्यात यश आलं असून १२ हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. गरजूंना मदत साहित्य आणि वैद्यकीय सहाय्य पुरवण्यात येत आहे.

**हॉकी**

वरीष्ठ पुरुष गटासाठीची चौथी हॉकी इंडिया आंतरविभागीय स्पर्धा आजपासून महाराष्ट्रात पुणे इथं सुरू होत आहे. या स्पर्धेत देशभरातले 18 संघ सहभागी होणार आहेत. टोक्यो ऑलिम्पिक खेळलेले सुरेंदर कुमार, आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता आकाशदीप तसंच ऑलिम्पियन धरमवीर आणि दिलप्रीत सिंग यांच्यासह अनेक नामवंत खेळाडू यात सहभागी होणार आहेत.

**<u>पॅरालिम्पिक्स</u>**

पॅरीस इथं सुरू असलेल्या पॅरालिम्पिक्स स्पर्धेत काल भारतीय क्रिडापटूंनी चमकदार कामगिरी करत चार पदकं पटकावली. यामध्ये दोन सुवर्णपदकांचा समावेश आहे. हरविंदर सिंगनं तिरंदाजीत ऐतिहासिक कामगिरी करत भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. काल रात्री झालेल्या स्पर्धेत पुरुष केरी रिकर्व प्रकारांत हरविंदर ही कामगिरी केली. धरमबीरनं पुरुषांच्या क्लब थ्रो F51 अंतिम सामन्यात 34 पुर्णांक 92 मीटर चा थ्रो नोंदवून आशियाई विक्रम मोडीत काढला आणि सुवर्णपदक पटकावलं. याच स्पर्धेत प्रणव सूरमाने 34 पुर्णांक 59 मीटर थ्रो करत रौप्य पदक जिंकलं.

तत्पूर्वी महाराष्ट्राच्या सचिन खिलारी यानं गोळाफेक प्रकारात रौप्य पदक पटकावलं. महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातल्या सचिननं अंतिम फेरीत १६ पूर्णांक ३२ शतांश मीटर गोळाफेक करुन पदक मिळवलं. या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत २४ पदकांची कमाई केली आहे. यामध्ये ५ सुवर्ण, ९ रौप्य आणि १० कास्य पदकांसह १३व्या स्थानावर आहे.

# याबरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार